




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com









वर्ष ३ रे | अंक : ७३५ . वा | शुक्रवार | दि. १२ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# देशभर एक राज्यघटना का नव्हती? कन्हानच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसला सवाल...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना संपूर्ण देशभरात लागू करण्याची हिंमत आजवर का दाखविली नाही, असा घणाघाती सवाल करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काँग्रेसला लक्ष्य केले. नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघासाठी कन्हान येथील संकल्प सभेत बोलताना मोदींनी काँग्रेसवर कठोर प्रहार केले. मागील दहा वर्षांत नागपूर जिल्ह्यात मोदी यांची ही पहिलीच प्रचार सभा होती.केंद्रीय मंत्री आणि नागपूर लोकसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार नितीन गडकरी, रामटेकमधील महायुतीचे उमेदवार राजू पारवे (शिवसेना), भंडारा-गोंदिया मतदारसंघातील भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभेला व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, पीरिपाचे अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे आदी उपस्थित होते.राज्यघटनेच्या नावावर संपूर्ण देशाला मुर्ख करण्याचे काम चालले आहे. समान नागरी कायद्यामुळे बौद्ध अनुयायांना नागरिकता मिळेल. ही मोदींची गॅरंटी आहे, असेही ते म्हणाले.मोदी तिसऱ्यांदा निवडून आल्यास लोकशाही धोक्यात येईल, ते संविधान बदलतीलफ असा अपप्रचार विरोधकांनी सुरू केला आहे. अटलजींच्या सरकारपासून ते हाच किता गिरवित आहेत. उत्तर ते दक्षिण आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एकाच परिवाराचा कब्जा असताना तसेच आणीबाणीच्या काळातदेखील लोकशाहीला धोका नव्हता, मात्र गरिबाचा मुलगा पंतप्रधान होताच लोकशाही आणि संविधान धोक्यात आल्याचे इंडिया आघाडीला वाटत आहे. गरिबांनी पुढे गेलेले त्यांना कधीच बघवत नाही. पाण्यावर काठी आपटल्याने पाणी दुभंगत नाही अशी एक मराठी म्हण आहे. त्याप्रमाणे विरोधकांच्या आरोपांमुळे मोदी कधीही संकल्पापासून मागे हटणार नाही, पंतप्रधान म्हणाले.निवडणूक सर्वेक्षणांनी एनडीएचा विक्रमी विजय दर्शविला आहे. एवढी खर्चिक सर्वेक्षणे करण्यापेक्षा पैसे वाचविण्याचा फॉर्म्युला देऊन मी माध्यमांना मदत करू इच्छितो. मोदींना शिव्यांची लाखोली वाहणे वाढते तेव्हा देशात पुन्हा मोदी सरकार येणार हा कल त्यांनी समजून घ्यायला हवा. माझ्या स्वर्गीय मातापित्यांना विरोधक शिव्या देत असतील, तर पुन्हा मोदी सरकार येणार हे निश्चित असते. ईव्हीएमविषयी प्रश्न उपस्थित केले गेले, की पुन्हा मोदी येणार हे त्यांना कळायला हवे, असे मत मोदींनी व्यक्त केले.देशातील लोक एकजूट झाले तर आपले राजकारण संपेल अशी भीती विरोधकांना आहे. त्यामुळे सर्वांनी एकजूट होऊन देशाच्या नावावर मतदान करावे. इंडिया आघाडी बळकट झाल्यास ते देशाला खंडित करतील. देशाला आनंद झाला असताना निमंत्रण अव्हेरून इंडिया आघाडीने अयोध्येतील राममंदिराच्या प्राणप्रतिष्ठापनेचा बहिष्कार केला.




सनातनी संस्कृती नष्ट करण्याचा संकल्प करणाऱ्यांसोबत ते रॅली काढतात. हिंदू धर्मातील शक्तीला ते संपविण्याच्या प्रयत्नात आहेत, असा आरोप मोदी यांनी केला.कलम ३७० हटवल्यास आग लागेल, असा भ्रम पसरवला गेला. कुठे आग लागली? कलम हटवल्याने डॉ. बाबासाहेबांचा आत्मा मला व आपल्या सर्वांना आशीर्वाद देत असेल. लोकशाही, राज्यघटना धोक्यात येईल, असा कांगावा करणाऱ्यांना नितीनजी ने बडा जमकर जबाव दिया है...फअशा शब्दांत मोदींनी गडकरींची प्रशंसा केली.

## संदीप शेळकेंनी संत नगरी शेगावातून फोडला प्रचाराचा नारळ शेगावात रोड शो करून साधला मतदारांशी संवाद

### मला फक्त ५ वर्षे द्या, पुढच्या वेळी प्रचाराची गरज पडणार नाही..

**जनसंचलन/ शेगाव**

वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा बुलडाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी काल,१० एप्रिलला आपल्या प्रचाराचा नारळ फोडला. संत नगरी शेगावातून संत श्री गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन शेळके यांनी प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी शेगाव शहरात भव्य रोड शो आयोजित करण्यात आला होता. शेगाव शहरातून संदीप शेळके यांच्या प्रचारार्थ निघालेल्या भव्य रोड शो द्वारे शेळके यांनी मतदारांशी संवाद साधला. शेगाव शहरातील मोक्याच्या ठिकाणी संदीप शेळके यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची भूमिका विषद केली. बुलडाणा जिल्ह्याचा आपल्याला कायापालट करायचा आहे. स्वातंत्र्यानंतर जेवढी विकासकामे जिल्ह्यात झाली नाहीत त्यापेक्षा अधिक गतीने काम आपण पुढच्या ५ वर्षात करू असे संदीप शेळके म्हणाले. बुलडाणा जिल्ह्याची ओळख आपल्याला विश्वपटलावर न्यायची आहे. शेगाव, लोणार, सिंदखेडराजा, ज्ञानगंगा अभयारण्य यासह जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करायचा आहे. प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी झाली तर रोजगाराचा प्रश्न सुटेल. शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न, तरुण आणि महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करू. राजकीय इच्छाशक्ती असेल तर



सर्व काही शक्य आहे असे म्हणत शेळके यांना मतदारांना मतरुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन केले. मी संसदेत पोहचलो तर पुढच्या ५ वर्षात असे काम करील की पुढच्या निवडणुकीत प्रचार करण्याची गरज पडणार नाही असेही संदीप शेळके म्हणाले.

## अल्पवयीन मुलीला पळविले युवकाविरूध्द गुन्हा दाखल

**जनसंचलन/दुसरबीड**

वडील बाहेरगावी गेल्याचा गैरफायदा घेऊन एका अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याप्रकरणी, तालुक्यातील जागदरी येथील एका २० वर्षीय युवकाविरुद्ध साखरखेर्डा पोलिस ठाण्यात ११ एप्रिल रोजी गुन्हा दाखल झाला आहे. तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, काही कामानिमित्ते छत्रपती संभाजीनगर येथे १० एप्रिल, बुधवारी गेलेले होते. त्यावेळी त्यांना त्यांच्या साडू चा भ्रमणध्वनी आला की, त्यांच्या घरात मुकी पत्नी, मुलगी व त्यांची सासू असतांना रात्री ८.३० च्या सुमारास, त्यांची १४ वर्षांची अल्पवयीन मुलगी कुटुंबातील कुणाला काहीही न सांगता घरुन कुठेतरी निघून गेली. यावरुन फिर्यादी ह्यांनी त्यांच्या गावी परत येऊन माहिती घेतली असता



अंकुश शिवाजी डोईफोडे हा अंदाजे २० वर्षांचा युवक त्यांच्या मुलीच्या मागावर राहत असे. मुलगी पळून गेल्याच्या घटनेनंतर तो सुद्धा त्याच्या गावातून फरार झालेला आहे. त्यामुळे त्यानेच कशाचे तरी आमिष दाखवून आपल्या मुलीला फुस लाऊन पळविल्याचा दाट संशय फिर्यादीत व्यक्त केला आहे. यावरुन साखरखेर्डा पोलिसांनी अंकुश शिवाजी डोईफोडे याच्याविरोधात अप नं. ९५/ २०२४ कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी ठाणेदार स्वप्नील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र सानप हे पुढील तपास करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मेरा बुद्रुक ते अंत्रीखेडेकर रोड चे काम रामभरोसे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष...




**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील मौजे मेरा बुद्रुक ते अंत्रीखेडेकर या रोड चे काम दिम्या गतीने किती क दिवसांपासून सुरू आहे साईड पट्ट्या भरल्या त्यामध्ये मुरूम मिक्स करून साईड पट्या भरलेले आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर महेश भाले यांना तोंडी वारंवार सांगून सुद्धा त्यांनी या कामाकडे पाठ फिरवली आहे आता तेच ठेकेदार रोडवर खड्डे भरण्याची काम सुरू केले आहे परंतु सदर शासकीय ठेकेदाराने या रोडवरच्या खड्ड्यातली माती सुद्धा काढली नाही त्याच मातीवर थातूरमातूर डांबरीकरणाचे काम शासकीय ठेकेदार करत आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही कर्मचारी या रोडवर फिरूनही दिसला नाही सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगाव राजा यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी आमच्याकडे कर्मचारी कमी असल्याचे कारण सांगून वेळ हाणून घेतली परंतु अधिकारी यांनी या कामाकडे लक्ष देली नाही सदर काम इस्टिमेट नुसार होईल याची दखल घेतली नाही त्यामध्ये ठेकेदार आणि शासकीय कर्मचारी यामध्ये सुद्धा मीली बघत असल्याचे दिसून येत आहे या रोडवर यापूर्वी भरपूर अपघात झाले आहे त्यामध्ये काही लोकांनी आपले जीव सुद्धा गमावले आहे याचे कोणतेही सुरक्षित शासकीय कर्मचारी व ठेकेदार यांना दिसून येत नाही कित्येक लोकांच्या संसार या रोडमुळे बरबाद झाले आहेत त्याच रोडचे काम आणखीन निकृष्ट दर्जाचे सुरू असलेली दिसून येत आहे या रोडवर जगप्रसिद्ध लोणार सरोवर सुद्धा या रोडवर जाता येते या रोडवर भरपूर गावी आहे मेरा बुद्रुक मेरा बुद्रुक अंत्री खेडेकर या रोडने समोर जगप्रसिद्ध लोणार सरोवर याकडे सुद्धा जात आहे ते त्यामुळे या रोडवर सतत रहदारी राहते त्यामुळे या रोडला विशेष महत्त्व प्राप्त झाले नाही या रोडवर भरपूर जणांचे अपघातामध्ये मृत्यू झाले आहे परंतु याचे कोणतेही सोयरसुतक या ठेकेदार व शासकीय कर्मचारी यांना दिसून येत नाही जर रोडचे काम व्यवस्थित झाले नाही तर सदर अपघातग्रस्त व्यक्तीच्या पत्नीच्या माध्यमातून सदर शासकीय कर्मचारी व ठेकेदार यांच्यावर मनुष्यवादाचा गुन्हा सुद्धा दाखल करण्याची चर्चा सुध्दा मेरा बुद्रुक अंत्री खेडेकर या परिसरामध्ये चालू आहे जर सदर काम व्यवस्थित केले नाही तर सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे सुद्धा भेट घेऊन सदर काम हे उत्कृष्ट दर्जाचे करून घेण्याची मागणी अंत्रीखेडेकर येथील काही ग्रामस्थांनी केली आहे तरी रामभरोसे चालू असलेल्या मेरा बुद्रुक अंत्री खेडेकर रोडच्या कामावर शासकीय कर्मचारी यांनी लक्ष देऊन उत्कृष्ट दर्जाचा कसा करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे

# महात्मा फुले जयंती मिरवणुकीत १३ वर्षीय मुलास मारहाण...

**जनसंचलन/ शेगाव**

शहरातील गांधी चौकात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त मिरवणूक सुरू असताना एका १३ वर्षाच्या मुलास फायटरने मारहाण केल्याचा घटना ११ एप्रिल रोजी रात्री वाजेदरम्यान घडली. ८ याबाबत शेख रेहान शेख वसीम, वय १३ व्यवसाय रा. पेठ मोहल्ला शेगाव याने पोलिसात फिर्याद दिली की, शहरातील गांधी चौकात माझ्या मित्रा सोबत महात्मा जोतीबा फुले यांचे जयंतीची मिरवणूक पाहत असतांना मिरवणूकीतील काही मुलांचे त्यांच्या-त्यांच्यात वाद सुरु असतांना त्यामधील एका अनोळखी मुलाने काहीएक कारण नसतांना माझ्या डोक्यावर डावे बाजूने त्याचे हातातील फायटर मारुन जखमी केले. त्याचे नाव मला माहीत नसुन मी चेहऱ्याने त्यास ओळखतो. तरी सदर अनोळखी व्यक्तीवर कार्यवाही व्हावी. करीता रिपोर्ट देत आहे. अशा तोंडी रिपोर्ट तसेच मेडीकल सर्टीफिकेटवरुन अज्ञात आरोपीवर कलम ३२४ भादंवि नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोउपनि कुणाल जाधव हे करीत आहेत. गांधी चौकात सुरू असलेल्या मिरवणूक मध्ये एका विशिष्ट समाजाच्या १३ वर्षाच्या मुलास अज्ञात व्यक्तीने फायटर मारून जखमी केल्याने शहरात काही काळ तणाव निर्माण झाला होत. तर आरोपीवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यासाठी पोलीस स्टेशन शेगाव समोर मोठी गर्दी होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर हि गर्दी ओसरली तर यावेळी एसडिपीओ विनोद ठाकरे यांनी घटनास्थळी भेट दिली व शांततेचे आवाहन केले आहे.

# आठवडी बाजारातून दुचाकी लंपास

**जनसंचलन/ खामगाव**



येथील आठवडी बाजारातून दुचाकी लंपास झाली. ही घटना ४ एप्रिल रोजी घडली. तक्रारीनुसार, नांदुरा तालुक्यातील पोटळी येथील प्यारसिंग जमरा यांनी एमएच २८ डब्ल्यू ८३०८ ही दुचाकी ४ एप्रिल रोजी आठवडी बाजारात उभी केली. काम आटोपून आल्यानंतर त्यांना दुचाकी आढळून आली नाही. दुचाकीचा इतरत्र शोध घेतल्यानंतरही दुचाकी आढळून न आल्यामुळे जमरा यांनी दुचाकी हरविल्याची तक्रार बुधवारी शहर पोलिसांत दिली.

# शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मजूर मिळेना !

**जनसंचलन/मेरा बु**

रब्बी हंगाम आटोपल्यामुळे आता शेतकरी शेत मशागतीच्या कामास सुरुवात करण्यासाठीं शेत मजुराचा शोध घेत आहे मात्र शेतमजुरांची वाढलेली मजुरी आणि त्याच बरोबर वाढीव मजुरी देऊनही शेती कामासाठी मजूर मिळणे अवघड झाले आहे त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसातील आणि खरीप पिकांसाठी शेत जमिनीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील काही वर्षांपासून भीषण पाणीटंचाई आणि दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्याजवळ पाळीव जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटली आहे. त्यामध्ये बैलाची तर अधिकच संख्या कमी झाली त्यामुळे पूर्वी पेरणीसाठी बैल, लाकडी शेती औजारे, याचा वापर केल्या जात असे मात्र बैल आणि लाकडी औजारे कमी होवून आता ट्रॅक्टर द्वारे शेतीची मशागत केली जात आहे. परंतु पेट्रोल, डिझेलचे दर सातत्याने वाढत चालल्यामुळे यंत्राद्वारे शेती करणे शेतकऱ्यांना परवडनासे झाले आहे दुसरीकडे तर मजुरांना दिवसाचे ५०० रुपये देऊन ते शेतात काम करण्यास तयार होत नाहीत. यावर्षी कापूस तसेच सोयाबीनला बऱ्यापैकी भाव मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना होती मात्र निसर्गाच्या आस्मानी संकटापायी शेतातील पिकांना मोठा फटका बसला आणि उत्पादनात मोठी घट झाली. त्यातच शेत मालाला बाजारात भाव मिळाला नाही. त्यामुळे नापिकीला शेतकरी कंटाळले आहेत. त्यातच सातत्याने वाढणाऱ्या भाववाढीमुळे शेती व्यवसाय करणे अवघड होऊन गेले. याआधी आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना काहीच मिळाले नाही, त्यामुळे आता खरीप पिकांची तयारी कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. सध्या शासनाच्या विविध योजनांतर्गत गोर-गरीबांना पुरेल एवढे अन्नधान्य कमी किमतीत त्यांच्या पदरात पडत असल्याने शेतमजूर वर्ग काम करण्यास इच्छुक दिसत नाही. शेतकऱ्यांना तर पूर्वी सारखा सालदलदार महिनदार, मिळत होते. आता तेही मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या कुंटूबाना सोबत घेवून शेतात काम करण्याची वेळ आली आहे. काम मजुराकडून करून घेण्याचे असेल तर रोख पैसे मोजावे लागतात. त्यातच निसर्ग साथ देत नसल्याने उत्पादन कमी व खर्च जास्त अशी परिस्थिती शेतकऱ्यावर येवून ठेपल्याने शेतकरी शेत मशागतीच्या कामासाठी मजूर नसल्याने हवालदिल होवुन गेला आहे.

# जावयास मारहाण साळ्याविरूध्द गुन्हा दाखल

**जनसंचलन/ शेगाव**



येथील पंचशील नगरात जावयास लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना १० एप्रिल रोजी रात्री ७ वाजता घडली आहे. याबाबत राजकुमार शिवाजी वानखेडे वय ४४ वर्षे रा भुसावळ ह. मु. पंचशील नगर शेगाव यांनी पोलिसात फिर्याद दिली की, माझा साळा सुधाकर तुळशिराम शेगोकार आम्ही सोबत दारू पिलो त्यानंतर आम्ही दोघेजण माझे घरी पंचशिल नगर शेगाव येथे रात्री ८ वा गेलो असता दारूच्या नशेत विनाकारण माझे घराचे अंगणामध्ये माझा साळा सुधाकर शेगोकार याने मला शिवीगाळ करण्यास सुरूवात केली मी त्याला शिवीगाळ करू नको असे म्हटले असता त्याने चिडुन अंगणातील लाकडी काळीने माझे डोकयावर, हातावर, पायावर मारहाण केली. मारहाणी मध्ये माझे डोके फुटून रक्त निघाले आहे तसे त्याने मला जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली आहे. अशा रिपोर्टवरून आरोपी सुधाकर तुळशिराम शेगोकार यांच्यावर कलम ३२४, ५०४, ५०६ भादं वी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ संजय करूटले करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा जोतिराव फुले यांना अभिवादन



**जनसंचलन/बुलढाणा**
जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा जोतिराव फुले जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नाझर गजानन मोतेकर, रमेश मुळे, अपेक्षा इंगळे आदी उपस्थित होते.

# मेरा खुर्द ग्रामपंचायत येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंती तर गावात ईद उत्साहात साजरी...

**जनसंचलन/ चिखली**
तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथे आज ग्रामपंचायत भवन येथे सरपंच रमेश अवचार यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ग्रामपंचायत उपसरपंच सदस्य गौतम गवाई सुनिल गवाई तंटामुक्ती अध्यक्ष अशफाक शाह नंदकिशोर काळे व इतर गावकरी मंडळी हजर होती या वेळी सरपंच रमेश अवचार यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना जगातील पहिली शिवजयंती साजरी करुन तमाम बहूजनांत अस्मिता जागृत करणारे तसेच आज जी शेतकरांची दयनीय अवस्था झाली आहे या विषयी जोतीबानी दीडशे वर्षापूर्वी शेतकराचा असूड या ग्रंथातुन रेखाटली आहे येथील बहुजन समाज एका वर्गाचा कसा गुलाम बनला आहे यांच सुंदर रेखाटन गुलामगिरी या ग्रंथातुन केले आहे या सारखे अनेक ग्रंथ लिहून समाज जागृती तसेच समाज्यातील तात्कालीन परीस्थितीवर जोरदार प्रहार आपल्या लेखनीतुन





क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी केला समाजात जर क्रांती करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही या साठी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यानी आयुष्यभर शिक्षण प्रसार करत राहिले आज आपल्याला महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर दिसतात ना त्या फक्त आणि फक्त महात्मा फुले आणि सावत्री माई यांच्यामुळेच आहेत कदाचित फुले जर नसते स्त्रीची ओळख चुल आणि मुल एवढीच मार्यादित राहिली असती पण यांची जाणीव फारच कमी माहिला ना आहे ही खेदाची बाब आहे

महात्मा जोतिबा फुले यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात जे कार्य केले आहे त्याचा सारा देश रुणी आहे आज समाजात एक म्हण आहे शिकलेली आई घरादाराला पुढे नेई त्यासाठी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी ही दूरदृष्टी ठेवून त्या काळामध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याची कार्य केले होते जर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाकडे लक्ष दिले नसते तर तर आज बहुजनांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले असते

तसेच मेरा खुर्द येथे मुस्लिम समाज सुद्धा मोठ्या संख्येने असल्यामुळे मेरा खुर्द येथे मोठ्या उत्साहामध्ये ईद साजरी करण्यात आली यावेळी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी पोलिसांचा चोक बंदोबस्त लावलेला होता मेरा खुर्द येथे भरपूर मज्जिती असल्यामुळे सर्व मजित जवळ चोख बंदोबस्त लावलेला होता अंढेरा पोलीस स्टेशनचे बीड जेमदार उगले तसेच सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी तसेच सर्व हिंदू बुद्ध माळी समाजाच्या प्रतिष्ठित व्यक्तींनी तसेच मुस्लिम समाजाच्या लोकांनी ईद मुबारक म्हणून सर्वांना शुभेच्छा दिल्या

# पाणी टंचाई निवारणार्थ टँकर मंजूर...

**जनसंचलन/बुलढाणा**
जिल्ह्यातील काही तालुक्यात सद्यस्थितीत पिण्याच्या स्त्रोतापासून आवश्यक पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दरडोई दरदिवशी २० लिटर्स उपलब्ध होण्यासाठी पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. अंभोरा, ता. देऊळगाव राजा येथे एका टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. अंभोरा गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे सदर गावामधील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांनी कळविले आहे.

# दिव्यांग नागरीकांच्या माध्यमातून मतदान जनजागृती अभियान...

**जनसंचलन/सिंदखेडराजा**
लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील सिंदखेडराजा विधानसभा क्षेत्रामध्ये निवडणुकीसाठी नियोजनबद्ध तयारी चालू आहे, लोकशाहीचा हा उत्सव साजरा करण्यासाठी सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील सिंदखेड राजा येथे मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. श्री. संजय खडसे,मा.तहसीलदार सिंदखेड राजा श्री. सचिन जयस्वाल, मा. तहसीलदार देऊळगावराजा वैशाली डोंगरजाळ, मा. नायब तहसीलदार निवडणूक श्री. मनोज सातव, अस्मा मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली आज मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री. प्रशांत व्हटकर यांच्या माध्यमातून विविध उपक्रमातुन मतदानासाठी जनजागृती करण्यात आली.उपक्रमांतर्गत नगरपरिषद सिंदखेडराजा राजा, महसूल विभाग देऊळगाव राजा, शिक्षण विभाग, सर्व शाळा महाविद्यालय यांच्या सहभागामधून आज दिनांक १० एप्रिल २०२४ रोजी सकाळी शहरातून दिव्यांग रॅलीचे, शाळेतील विध्यार्थ्यांच्या रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद गावातील नागरिकांकडून मिळाला आहे, या सर्व उपक्रमाचे व्यवस्थापन नगरपरिषद सिंदखेडराजा यांच्यावतीने करण्यात आले होते. आजच्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध प्रकारे संदेश काही स्लोगन च्या माध्यमातून देण्यात आले. गरीब-श्रीमंत, जात-धर्म-लिंग या भेदापासून दूर म्हणजे आपले मत, सर्वांना समान अधिकाराच्या तत्त्वाची प्रतिबिंब म्हणजे आपले मतफक्त लोकशाहीतील समानतेचे ही मूल्य अधिक बळकट करूया, चला आत्मविश्वासाने मत देण्याचा निर्धार करूया. जागरूक आणि जाणकार मतदार




होऊ या, माहितीच्या आधारे योग्य उमेदवार निवडून या प्रलोभन मुक्त निवडणुकीचा निर्धार करू, उत्सव लोकशाहीचा साजरा करूफक्तआजच्या या कार्यक्रमाला मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा राजा नगरपरिषद श्री. प्रशांत व्हटकर तसेच सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होता. प्रसार माध्यमांमध्ये श्री अंकुश मस्के, प्रकाश शिंदे भूमापक श्री उ.व्ही. गरकळ श्री संजय सोनने महसूल सहाय्यक काम करीत आहे.

# बुलडाणा येथे पशूपक्षीपालन प्रशिक्षण...

**जनसंचलन/बुलढाणा**
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींसाठी बुलडाणा येथे शेळी, कुक्कट, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. दि. २३ ते २७ एप्रिल २०२४ या पाच दिवसाच्या कालावधीत हे प्रशिक्षण होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगारांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. सदर प्रशिक्षणात शेळी, कुकुट, गाय आणि म्हैसपालनाचे तंत्र आणि प्रकार त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन रोग आणि लक्षणे, खाद्य निर्मिती आणि चाऱ्याचे प्रकार, उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य, त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, सहकार्य, तसेच शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षणात तंज्ञ व्यक्ती करणार आहेत. प्रशिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान पाचवी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षण नोंदणीसाठी दि. २३ एप्रिल २०२४ पर्यंत कार्यलयीन वेळेत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गणेश गुप्ता, संपर्क क्रमांक ८२७५०९३२०१, ९०११५७८८५४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे.

# आचारसंहितेमुळे लोकशाही दिन रद्द

**जनसंचलन/बुलढाणा**
सामान्य जनतेच्या तक्रारी आणि गऱ्हाणी अडचणी जाणून घेण्यासाठी व तक्रारींचे निरसन करण्यासाठी लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. राज्यात लोकसभेच्या ४८ जागांकरीता पाच टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. त्यामुळे आचारसंहिता संपुष्टात येईपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन रद्द करण्यात आले आहे.

# ममिक्री केली, खिल्ली उडवली, ठाकरेंच्या वाघिणीने शिंदेंच्या लेकाला डिवचलं

**वृत्तसंस्था/ अंबरनाथ**

अंबरनाथ शहरात महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. यावेळी त्यांनी शिंदे गटाचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्यावर जोरदार टीका करत त्यांची मिमिक्री केली. अंबरनाथच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सदाशिव पाटील यांच्या कार्यालयात महाविकास आघाडीचे उमेदवार वैशाली दरेकर या भेटीसाठी आल्या होत्या. यावेळी त्यांनी पदाधिकारी यांच्याशी विविध प्रश्नांवर चर्चा केली. आपल्या भाषणांमध्ये दरेकर यांनी सांगितले की २०१४ मध्ये ज्याला अ ब क बोलता येत नव्हतं ते त्यांना शिवसेनेने शिकवलं. याबाबतचा प्रश्न ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांना विचारला असता त्यांनी सांगितले की अ ब क... म्हणजे काय माहिती आहे का? आपण जे काम करतोय,आपल्याकडील सध्याची परिस्थिती असेल किंवा समाजामध्ये जे काय चाललंय याचे विचार ज्याच्या मेंदूमध्ये क्लियर असतात, तो कधी या ठिकाणी त्या ठिकाणी, मग असं करत नाही, असे नक्कल करुन दाखवत दरेकर यांनी श्रीकांत शिंदेंची खिल्ली उडवली. आज मी अंबरनाथ मध्ये आले, अंबरनाथमध्ये लोकांचे प्रश्न काय आहेत? मी तुम्हाला एक सांगू इच्छिते की, आमचा कुठलाही कार्यकर्त्याला तुम्ही इथे विचारलं ना की अंबरनाथ मधील प्रश्न काय? तर तो तुम्हाला झटाझट सांगेल. कारण तो रोज अंबरनाथमध्ये फिरतोय. तो अनुभवतोय, जो अनुभवतो ना त्याच्या डोक्यामध्ये सगळे विषय क्लियर असतात, असं बोलत वैशाली दरेकर यांनी श्रीकांत शिंदे यांच्यावर टीका करत मिमिक्री केली आहे.दरम्यान, बुधवारी उपमुख्यमंत्री फडणवीस बदलापुरात आले होते, यावेळी त्यांनी महाविकास आघाडीला टोला लागवला. यालाच आता ठाकरे गटाच्या उमेदवार दरेकर यांनी उत्तर दिले आहे. महायुतीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकमेव इंजिन असून त्याला आपण वेगवेगळे डबे जोडले असून ही गाडी विकासाच्या दिशेने धावत आहे. मात्र, सध्या महाविकास आघाडीची अवस्था पाहता त्यांच्यात प्रत्येकाने स्वतःला इंजिन घोषित केले असून यांच्या प्रत्येक इंजिनाची दिशा वेगळी आहे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलापूर येथे महाविकास आघाडीला लगावला. कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघातील खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि कपिल पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यासाठी बदलापूरमध्ये आलेल्या फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. यावरच ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर आपली प्रतिक्रिया देत सांगितले की, ठीक आहे? आमची भरकटलेली गाडी असू दे. डबे नसलेली इंजिन असू द्या. तुम्ही जी नवनवीन इंजिन जॉईन करताय, त्यातून तुमचा कितपत धूर निघतो ते बघा, असा टोला दरेकर यांनी लागवला.कल्याण मधील नववर्ष स्वागत यात्रेत भाजप आमदार गणपत गायकवाड पत्नी सुलभा गायकवाड आणि ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्यासोबत दिसल्या होत्या. याबाबत दरेकर यांना प्रश्न विचारला असता त्यांनी सांगितले की ती एक साधी गृहिणी आहे. आज त्यांना यावं लागलं कारण त्यांचे पती गणपत गायकवाड इथे नाहीत, परंतु मी जेव्हा त्यांना भेटली तेव्हा त्यांना अश्रू अनावर झाले. तुम्ही उभ्या आहात उमेदवारी मिळाली आहे, माझे शुभाशीर्वाद आहेत, विजयी भव... असे दरेकर यांनी सांगितले.





# विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात डांबणे सत्ताधारयांसाठी पायंडा पडेल

## केजरीवाल यांचा सर्वोच्च न्यायालयात मोदी सरकारवर हल्ला

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात डांबणे सत्ताधारयांसाठी पायंडा पडेल, केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात मोदी सरकारवर हल्ला केला आहे. कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी केलेली अटक योग्यच असल्याच्या दिल्ली हायकोर्टाच्या निर्णयाला दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. बुधवारी केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. लोकसभा निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत मला तुरुंगात डांबण्यात आले आहे. जर याचिकाकर्त्याला लोकसभा निवडणुकीत सहभागी होण्यासाठी तातडीने सोडले नाही तर निवडणुकीच्या आधी विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात डांबणे हे सत्ताधारयांसाठी पायंडा पडेल, अशा शब्दांत केजरीवाल यांनी मोदी सरकारकडून तपास यंत्रणांच्या आडून कारवाई करण्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. केजरीवाल यांच्यावतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. ही याचिका मुख्यमंत्री केजरीवाल यांच्याबाबत असून अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या पुराव्यांच्या आधारावर केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे, त्यावर विश्वास ठेवता येणार नाही, असे सिंघवी म्हणाले. यावर याबाबतचे तुमचे म्हणणे ई-मेल करावे त्यावर आम्ही विचार करू असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले. दरम्यान, याचिकेवर सोमवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे.



# प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ शेगावात शनिवारी मुख्यमंत्र्यांची आढावा बैठक



**जनसंचलन/बुलढाणा**

महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार प्रतापराव जाधव यांचा बुलडाणा लोकसभा मतदारसंघातील विजय सुकर होण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी शनिवार १३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता शेगाव येथील देशमुख मंगल कार्यालय येथे लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या सर्व पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीस सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचे आमदार माजी कॅबिनेट मंत्री राजेंद्र शिंगणे, मेहकर विधानसभा मतदार संघाचे आ. संजय रायमुलकर, खामगांव मतदार संघाचे भाजपा आ. आकाश फुंडकर चिखली मतदार संघाच्या भाजपा आ. सौ. श्वेताताई महाले तसेच बुलढाणा मतदार संघाचे आ. संजय गायकवाड हे उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे बुलढाणा लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभा मतदार संघातील महायुतीमध्ये समाविष्ट शिवसेना पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी त्याचप्रमाणे रि. पा. ई. (आठवले गट) व रयत क्रांती संघटना तसेच सहयोगी सर्व पक्ष यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीला आवर्जून उपस्थित रहावे.. अशी विनंती खा. प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाद्वारे करण्यात आली आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958